तपासी अधिकारी यांचे करीता.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर    **P.S.(ठाणे):** पारनेर    **Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0846

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/11/2024 13:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 15/10/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/10/2024

**Time From (वेळेपासून):** 16:01 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/11/2024    **Time (वेळ):** 12:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 010

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/11/2024 12:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय पारनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भानुदास रावसाहेब दिवटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुईछत्रपती, ता पारनेर, जिअहि,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रुईछत्रपती, ता पारनेर, जिअहि,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7666020126

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल बाबुराव फापाळे | | | 1. तहसिल कार्यालय पारनेर,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 27/11/2024

मी भानुदास रावसाहेब दिवटे, वय 38 वर्षे, धंदा शेती व उपसरपंच, ग्रामपंचायत रुईछत्रपती रा. रुईछत्रपती, ता. पारनेर, जि.अहिल्यानगर, मो.नं. 7666020126

समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर राहणेस आहे. मी दि. 15/10/2024 रोजी पारनेर येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहुन पोलीस उपअधीक्षक श्री.त्रिपुटे, ला.प्र.वि.अहमदनगर यांना दोन पंचासमक्ष लाचमागणीची तक्रार सांगितली होती की, ''मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन सध्या ग्रामपंचायत रुईछत्रपती येथे उपसरपंच पदावर सुमारे दिड वर्षापासुन काम करत आहे. आमच्या गावातील रस्ता कॉक्रीटीकरणाची 11 कामे मंजुर होण्याबाबत ग्रामसभेत ठराव मंजुर करण्यात आला होता. सदर कामे म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत मंजुर होणेकरीता मा. तहसिलदार तथा गट कार्यक्रम अधिकारी म.ग्रा.रो.ह.यो.पारनेर यांना संबंधीत कामाच्या कागदपत्रासह पत्र दिले होते. त्यानंतर मा.तहसिलदार पारनेर यांनी सदर कामाची म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण कामांसाठी अंदाजपत्रके व तांत्रिक मान्यता मिळणेबाबत उप अभियंता, जि.प.सा.बां.उप विभाग, पारनेर यांना पत्र दिले होते. त्यावरुन उप अभियंता, जि.प.सा.बां.उप विभाग, पारनेर उप विभाग पारनेर यांनी रुईछत्रपती येथील 11 कामाचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता देवुन प्रशासकीय मंजुरीसाठी मा. तहसिलदार पारनेर यांना सादर केले होते. आमचे गावची सरपंच महिला असल्याने, त्यांना सदर कामाकरीता जाणे शक्य नसल्याने मी व माझा मित्र श्री. चंद्रशेखर सोन्याबापु साबळे असे तहसिल कार्यालय पारनेर येथील प्रशासकीय मान्यता कामकाज पाहणारे अव्वल कारकुन सुनिल फापाळे यांची भेट घेवुन आमचे गावातील वर नमुद कामाच्या प्रशासकीय मान्यतेबाबत चर्चा केली असता, श्री. फापाळे यांनी 11 कामाच्या प्रशासकीय मान्यता देणेकरीता सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 3 टक्के रक्कम मला व तहसिलदार श्रीमती सौंदाणे मॅडम यांना दयावी लागेल. असे म्हणुन आमचेकडे लाचेची मागणी केली. त्यानंतर आम्ही दि.15/10/2024 रोजी तहसिलदार श्रीमती सौंदाणे यांची भेट घेवुन वर नमुद कामाच्या प्रशासकीय मान्यतेबाबत चर्चा केली असता,त्यांनी तुम्हाला प्रोटोकॉल माहित नाही काय? सध्या काय चालले आहे तुम्हाला माहित नाही का? असे म्हणाल्या. त्यावेळी आमचे लक्षात आले की 11 कामाची प्रशासकीय मान्यता मिळुन देण्याकरीता श्री.फापाळे यांनी आमचेकडे लाचेची मागणी केलेली आहे व तहसिलदार मॅडम देखील आमचेकडे लाचेची मागणी करण्याचा संशय आहे. आम्हाला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी व श्री. साबळे आज पुन्हा तहसिल कार्यालयात जावुन फापाळे व तहसिलदार सौंदाणे यांची भेट घेवुन आमच्या गावातील कामाच्या प्रशासकीय मान्यता संबंधाने चर्चा करणार आहे. सदर चर्चे दरम्यान फापाळे व तहसिलदार सौंदाणे यांनी आमचेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी.'' अशी तक्रार नोंदविली होती. पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी माझी वरील तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. त्या तक्रारीवर मी,माझा मित्र साबळे, दोन्ही पंचांनी व पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सही केली. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे अव्वल कारकुन फापाळे व तहसिलदार श्रीमती सौंदाणे हे आमचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्यानंतर पो.उप अधी.श्री.त्रिपुटे यांनी मला, श्री.साबळे व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईमध्ये व्हाईस रेकॉर्डरचे वापराबाबत माहिती दिली. श्री.त्रिपुटे यांचे सुचनेवरून पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून पो.उपअधी.श्री.त्रिपुटे, दोन्ही पंचांनी, श्री.साबळे व मी निवेदन केले. त्यानंतर पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी मला, श्री. साबळे व पंच क्र.1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तो माझे म्हणण्याप्रमाणे माझे मित्र श्री.साबळे यांचे ताब्यात देवुन मला, श्री. साबळे व पंच नं. 1 यांना अव्वल कारकुन फापाळे व तहसिलदार श्रीमती सौंदाणे यांची भेट

घेण्यासाठी 16/01 वा. आमचेकडील मोटार सायकल वरुन रवाना केले. त्यावेळी आम्ही तेथे जावुन फापाळे यांची भेट घेतली. फापाळे व आमचेत बरेच वेळ कामाच्या संबंधाने चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान लोकसेवक फापाळे यांनी मिटींग झाल्यावर तुमच्या सहया घ्यायच्या आहेत. मी सगळं तयार करुन ठेवले आहे, दोन टक्क्यांन हिशोब करा असे म्हणाले. त्यावर श्री. साबळे यांनी किती होतात असे विचारले असता लोकसेवक फापाळे यांनी साडे पाच असे सांगितले. त्यावर श्री. साबळे यांनी साडेपाच लाख रुपये, साडे पाच नाही होणार एवढयात, तहसिलदार मॅडमशी बोलुन घेवुन थोडं कमी करण्याकरीता त्यांचे सोबत बोलण्याकरीता विनंती केली असता लोकसेवक फापाळे यांनी वेळ लागेल, बोलतो मी आता त्यांना असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक फापाळे हे तहसिलदार यांचे कॅबीनमध्ये गेले. त्यानंतर काही वेळाने लोकसेवक फापाळे तहसिलदार यांचे कॅबिनच्या बाहेर आले व तुम्ही किती पैसे देवु शकता असे म्हणाले असता, श्री. साबळे यांनी तुम्ही किती घेता असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक फापाळे यांनी मॅडमनी वरचे पन्नास सोडुन दयायला लावलेत, असे म्हणाले. त्यावर मी फापाळे यांना लई होतेत राव असे म्हणुन मी व साबळे यांनी पैसे कमी करण्याकरीता बाललो. त्यानंतर मी दोन्ही मिळुन किती होतेत असे विचारल्यावर लोकसेवक फापाळे यांनी चार लाख असे म्हणुन लाचेची मागणी करुन, उदया किती वाजता येणार असे विचारले असता श्री. साबळे यांनी उदया येईन बारा वाजेपर्यत असे म्हणुन मी, श्री.साबळे व पंच 1 तेथुन निघुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी पोकॉ कराड यांनी श्री.साबळे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर मी, श्री. साबळे व पंच नं. 1 अशांनी वरील प्रमाणे पंच नं.2 यांचे समक्ष हकिकत पो.उपअधी श्री.त्रिपुटे यांना सांगितली. त्यानंतर पो.उपअधी श्री. त्रिपुटे यांनी पंचा समक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले असता, त्यामध्ये फापाळे यांनी स्वतःकरीता व तहसिलदर सौंदाणे यांचे करीता 11 कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या दोन टक्के प्रमाणे 5,50,000/- रु. लाच मागणी करुन तडजोडी अंती 4,00,000/- रु. लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे निश्पन्न झाले.परंतु आमची तहसिलदार सौंदाणे यांचेशी प्रत्यक्ष भेट न झाल्यामुळे तहसिलदार सौंदाणे यांचेविरुध्द दि.16/10/2024 रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले.

त्यानंतर आम्ही दि.16/10/2024 रोजी 10/30 वा. पारनेर येथील सुरक्षित ठिकाणी हजर होतो. त्याठिकाणी पो.उपअधी.श्री. त्रिपुटे हे सापळा पथक व दोन पंचासह शासकिय वाहनाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. पो. उपअधी श्री.त्रिपुटे यांनी मला,श्री. साबळे व पंच नं. 1 यांना सर्व सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकून, व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तो श्री. साबळे यांचे गळयात अडकवुन मला,श्री.साबळे व पंच नं.1 यांना आमचेकडील मोटार सायकलने तहसिलदार सौंदाणे यांची तहसिल कार्यालय पारनेर येथे भेट घेण्यासाठी 12/21 वा. रवाना केले असता, आम्ही तहसिलदार यांचे कॅबिन समोर गेलो. त्यावेळी तहसिलदार यांचे कार्यालयात प्रांत साहेब बसलेले होते. बऱ्याच वेळाने प्रांत साहेब त्यांच्या वाहनाने व तहसिलदार सौंदाणे हया त्यांच्या निवासस्थानाकडे निघुन गेल्या. त्यानंतर मी, श्री.साबळे व पंच 1 तेथुन निघुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 14/28 वा.परत आलो. त्यावेळी पोकॉ कराड यांनी श्री.साबळे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर मी, श्री. साबळे व पंच नं. 1 अशांनी वरील प्रमाणे हकिकत पंच नं.2 यांचे समक्ष पोउपअधी श्री. त्रिपुटे यांना सांगितली. त्यावेळी तहसिल कार्यालय पारनेर येथे ई व्ही एम मशिनची गाडी आलेली असुन सदरचे ई व्ही एम मशिन प्रांत साहेब व तहसिलदार मॅडम या चेक करुन परत सिल करणार आहेत. सदर कामास पाच वाजेपर्यत वेळ लागेल असे मी सांगितल्याने आम्हास तहसिलदार सौंदाणे यांची भेट घेण्याकरीता पाच वाजेनंतर रवाना करण्याचे ठरले. त्यावेळी आम्ही सापळा पथक असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यानंतर पो.उपअधी श्री.त्रिपुटे यांनी मला, श्री.साबळे व पंच नं. 1 यांना सर्व सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन श्री. साबळे यांचे गळयात अडकवुन मला,श्री.साबळे व पंच नं. 1 यांना आमचेकडील मोटार सायकलने तहसिलदार सौंदाणे यांची तहसिल कार्यालय पारनेर येथे भेट घेण्यासाठी 17/12 वा. सुमारास रवाना केले असता, आम्ही तहसिल कार्यालयातील तहसिलदार यांचे कॅबिन समोर गेलो. त्यानंतर मी व श्री. साबळे असे तहसिलदार यांच्या कॅबिनमध्ये गेलो.त्यावेळी तहसिलदार सौंदाणे यांनी कालच काम झाले तुमचे, कालच उरकावलं, आचारसंहिता लागल्यावर करता येत नाही, म्हणुन डिस्पॅचला देवुन टाकलं असे म्हणाल्या. त्यावर श्री.साबळे यांनी आमची ऑर्डर झाली का असे विचारता तहसिलदार सौंदाणे यांनी कालच झाली, ती तुम्हाला कशी मिळेल, ती पंचायत समितीला गेली असेल, कालच करुन टाकले, जेवढे शिल्लक होत्या, तेवढया मंजुर केल्या. असे म्हणाल्या. त्यानंतर मी, श्री.साबळे व पंच 1 तेथुन निघुन सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 18/45 वा.परत आलो. त्यावेळी पोकॉ कराड यांनी श्री.साबळे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर मी, श्री. साबळे व पंच नं.1 अशांनी वरील प्रमाणे हकिकत पंच नं.2 यांचे समक्ष पोउपअधी श्री. त्रिपुटे यांना सांगितली. तहसिलदार सौंदाणे यांनी आमचेशी गावातील कामाच्या प्रशासकीय मान्यते संबंधाने चर्चा केलेली

असुन सदर चर्चे दरम्यान लाचे संबंधाने कोणतीही चर्चा झालेली नाही. तसेच सदर भेटीवेळी लोकसेवक फापाळे सोबत नसल्यामुळे तहसिलदार सौंदाणे यांनी आमचेशी थोडा वेळ चर्चा केली. लोकसेवक फापाळे यांनी तहसिलदार मॅडम यांचेकरीता लाचेची मागणी केली असुन तहसिलदार सौंदाणे हया आमचेकडे लाचेची मागणी करण्याची शक्यता असल्याने उदया आम्ही अव्वल कारकुन फापाळे यांना सोबत घेवुन तहसिलदार सौंदाणे यांची पुन्हा भेट घेवुन त्यांचेशी आमचे कामाबाबत चर्चा करणार आहोत.''असे कळविल्यावरून तहसिलदार सौंदाणे यांचेविरुध्दची लाचमागणी पडताळणी दि.17/10/2024 रोजी करण्याचे ठरले.

त्यानंतर पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही दि.17/10/2024 रोजी 11/00 वा. पारनेर येथील सुरक्षित ठिकाणी हजर होतो. त्यावेळी पो.उपअधी.श्री. त्रिपुटे हे सापळा पथक व दोन पंचासह शासकिय वाहनाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. पो.उपअधी श्री.त्रिपुटे यांनी मला,श्री. साबळे व पंच नं. 1 यांना सर्व सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरीकार्ड टाकून, व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन श्री. साबळे यांचे गळयात अडकवुन मला,श्री.साबळे व पंच नं.1 यांना आमचेकडील मोटार सायकलने अव्वल कारकुन फापाळे यांना सोबत घेवुन तहसिलदार सौंदाणे यांची तहसिल कार्यालय पारनेर येथे भेट घेण्यासाठी 11/38 वा. सुमारास रवाना केले असता, आम्ही तहसिल कार्यालय, पारनेर येथे गेलो. त्यावेळी तहसिल कार्यालयात कोणीच हजर नव्हते. त्याबाबत आम्ही चैकशी केली असता, गणेश मंगल कार्यालय पारनेर येथे ईलेक्शन ट्रेनिंग असुन सर्व कर्मचारी तेथे गेले असल्याचे समजले. त्यामुळे मी, श्री. साबळे व पंच नं.1 असे मोटार सायकलवरून सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 12.29 वा. परत आलो. त्यावेळी पोकॉ कराड यांनी श्री.साबळे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर मी, श्री. साबळे व पंच नं. 1 अशांनी वरील प्रमाणे हकिकत पंच नं.2 यांचे समक्ष पोउपअधी श्री. त्रिपुटे यांना सांगितली. तहसिल कार्यालयातील कर्मचारी हे ईलेक्शन ट्रेनिंगला असल्यामुळे आम्हाला लोकसेवक फापाळे व तहसिलदार सौंदाणे मॅडम यांची भेट घेण्याकरीता तीन वाजेनंतर रवाना करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर 15/25 वा. दरम्यान पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन श्री. साबळे यांचे गळयात अडकवुन दिले. मी, श्री. साबळे व पंच नं.1 यांना लोकसेवक फापाळे व तहसिलदार श्रीमती गायत्री सौंदाणे यांची तहसिल कार्यालय पारनेर येथे भेट घेण्यासाठी आमचेकडील दुचाकी वाहनाने रवाना केले असता, आम्ही फापाळे यांचे कार्यालयीन कक्षात गेलो तेथे फापाळे उपस्थित नव्हते. त्यावेळी श्री. साबळे यांनी तेथे उपस्थित असलेल्या एका इसमास फापाळे साहेब कुठे आहेत असे विचारले असता त्या इसमाने फापाळे हे रजेवर असुन ते कोर्टात गेले आहेत असे सांगितले. त्यानंतर श्री. साबळे यांनी त्यांचे मोबाईलवरून फापाळे यांना फोन लावला असता फापाळे यांचा मोबाईल नंबर बंद असल्याचे समजले. त्यामुळे मी, श्री. साबळे व पंच नं.1 असे मोटार सायकलवरून सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 16.12 वा. परत आलो. त्यावेळी पोकॉ कराड यांनी श्री. साबळे यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर मी, श्री. साबळे व पंच नं. 1 अशांनी वरील प्रमाणे हकिकत पंच नं.2 यांचे समक्ष पोउपअधी श्री. त्रिपुटे यांना सांगितली. पो.उपअधी श्री.त्रिपुटे यांनी मला व श्री. साबळे यांना लोकसेवक फापाळे यांचेशी संपर्क झाल्यास किंवा ते कार्यालयात हजर असल्यास त्वरीत संपर्क करण्याबाबत तसेच सदर कारवाईबाबत गोपनियता बाळगण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर दि.18/10/2024 रोजी पासुन वारंवार आम्ही लोकसेवक फापाळे हे कार्यालयात हजर आहेत का याची आमचे ओळखीच्या लोकांकरवी व स्वतः कार्यालयात जावुन माहिती घेतली आहे. परंतु फापाळे हे दि. 17/10/2024 रोजी पासुन कार्यालयात हजर झाले नाहीत. त्याचप्रमाणे आम्ही फापाळे यांना मोबाईल व्दारे वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु एकतर त्यांचा फोन बंद लागत आहे किंवा फोन लागला तर ते आमचा फोन उचलत नाहीत. त्यामुळे माझ्या असे लक्षात आले की, फापाळे यांना माझा काहीतरी संशय आला असावा म्हणुन ते कार्यालयात हजर राहत नाहीत. तसेच त्यांनी स्वतःहुन मला फोन सुध्दा केला नाही. त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम ते भविष्यात माझ्याकडुन स्वीकारणार नाही, अशी माझी खात्री झाली आहे. तरी सदर कारवाई पुर्णतः स्थगित करून आमच्या गावातील 11 कामाच्या प्रशासकीय मान्यता मिळुन देण्याकरीता तहसिलदार सौंदाणे यांचे करीता व स्वतःकरीता मागणी केलेली 4,00,000/-रुपये लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन लोकसेवक फापाळे यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी. असे सांगितले आहे. त्याप्रमाणे पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी माझा तसा जबाब नोंदवुन घेतला.

आज रोजी पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी माझेशी संपर्क करून कळविले की, लोकसेवक फापाळे यांनी दि. 15/10/2024 रोजी माझेकडे आमच्या गावातील 11 कामाच्या प्रशासकीय मान्यता मिळुन देण्याकरीता तहसिलदार सौंदाणे यांचे करीता व स्वतःकरीता मागणी केलेली 4,00,000/-रु.लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत वरिष्ठ कार्यालयाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे कळविले व लोकसेवक फापाळे यांचेविरुध्द फिर्याद देणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी फिर्याद देत आहे.

तरी मौजे रुईछत्रपती ता.पारनेर येथील 11 कामाच्या प्रशासकीय मान्यता मिळुन देण्याकरीता दि. 15/10/2024 रोजी नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान 16/01 ते 19/06 वा. या कालावधीत तहसिल कार्यालय पारनेर येथे पंच नं. 1 यांचे समक्ष श्री. फापाळे,अव्वल कारकुन यांनी माझ्याकडे तहसिलदार श्रीमती सौंदाणे यांचेकरीता व स्वतःकरीता 5,50,000/- रुपये लाच मागणी करुन तडजोडी अंती 4,00,000/-रु. लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याने माझी लोकसेवक सुनिल बाबुराव फापाळे, अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय पारनेर यांचे विरूध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sameer navnath baravkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Diwate B.R.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पारनेर पो.स्टे., जि.अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** sameer navnath bar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**